डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

(नॅक समिती तर्फे अदर्जा प्राप्त)

वित्त व लेखा विभाग

विद्यापीठ परिसर ,
औरंगाबाद - ४३१ ००४ (महाराष्ट्र)
तार :- बामुसिटी
Web Site - www.bamu.net
E-mail :financeoffice@bamu.ac.in

वित्त व लेखाधिकारी (का.):- २४०३३००
फॅक्स :- (०२४०) २४०३२९९
लेखाधिकारी (का.):- २४०३१२४
सहा. कुलसचिव (अंकेक्षन) (का.):- २४०३१२५
सहा. कुलसचिव (लेखा) (का.) :- २४०३१५५

(दूरध्वनी कार्यालय (लेखा): अनुदान: २४०३१२६, रोख: २४०३१२७, देयक: २४०३१२८, वेतन: २४०३१२९, रोजकीर्द: २४०३१३०, प्रकाशन: २४०३१३१)

परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील शिक्षक/शिक्षकेत्तर/एकत्रित वेतन/विद्यापीठातील फंडातील वेतनावरील कर्मचाऱ्यांना मा. जिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र क्रमाक २०२१ /कोविड/ ४९३ दिनाक २२/११/२०२१ याद्वारे कोविड - १९ प्रतिवंधात्मक लसीकरणाच्या दोन्ही मात्रा (Dose) घेणे अनिवार्य असल्याने, कमीत कमी कोविड - १९ प्रतिबंधात्मक लसीकरणाची एक मात्रा (Dose) घेतलेले प्रमाणपत्र घेतल्यानंतरच, माहे नोव्हेंबर - २०२१ (Paid in माहे डिसेंबर) या महिन्याचे वेतन देयक अदा करण्यात यावे असे आदेशित केले आहे. तसेच अधिकारी/कर्मचारी यांचे सर्व प्रकारचे वैयक्तिक मागण्या बाबतचे देयके पारीत करण्यात येऊ नये. खाजगी व्यक्ती बाबतच्या इतर वैयक्तिक देयकासही उपरोकत नमूद बाब अनिवार्य राहील. याबाबत आपले अनिनस्त सर्व अधिकारी यांना सक्त निर्देश देण्यात यावे. तेव्हा विद्यापीठातील शिक्षक/शिक्षकेत्तर/एकत्रित वेतन/विद्यापीठातील फंडातील वेतनावरील कर्मचाऱ्यांचे माहे नोव्हेंबर - २०२१ (Paid in माहे डिसेंबर) या महिन्याचे वेतन देयक अदा करण्यासाठी दिनांक २९.११.२०२१ पर्यंत कोविड - १९ प्रतिबंधात्मक लसीकरण प्रमाणपत्राची छायांकित प्रत, आधार कार्डची छायांकित प्रत व त्यावर कर्मचारी क्रमांक टाकुन वेतन कक्षात जमा करण्यात यावे, ज्या शिक्षक/शिक्षकेत्तर/एकत्रित वेतन/विद्यापीठातील फंडातील वेतनावरील कर्मचाऱ्यांनी कोविड - १९ प्रतिबंधात्मक लसीकरणाची एकही मात्रा घेतली नाही, किंवा कोविड - १९ प्रतिबंधात्मक लसीकरण प्रमाणपत्र सादर केले नाही अशा कर्मचारी यांचे वेतन अदा करण्यात येणार नाही व त्याची स्वर्ववी जबाबदारी कर्मचाऱ्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसर, औरंगाबाद.
संदर्भ क्रमांक वित्त व लेखा/वेतन/२०२१/2008-2107
दिनाक :- २४.११.२०२१
26-

][
][
][
][

RSLmpawanshe
कुलसचिव

*****

या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :-

१] सर्व संचालक/विभाग प्रमुख, शैक्षणिक व प्रशासकीय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परीपत्रक सर्व संबंधीताच्या निदर्शनास आणावे.

२] संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप-परिसर, उस्मानाबाद यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परीपत्रक सर्व संबंधीताच्या निदर्शनास आणावे.

३] संचालक, युनिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना कळविण्यात येते की, सर्व विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या भ्रमणदुरध्वणी वर मेसेस (SMS) द्वारे कोविड - १९ प्रतिबंधात्मक लसीकरण प्रमाणपत्र सादर करण्याकरिता कळवावे व सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

महाराष्ट्र शासन

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, फाजलपुरा, औरंगाबाद - 431001
☎ : (0240) 2334501/2/3 ईमेल – collector.aurangabad@maharashtra.gov.in; abdcoll@gmail.com

जा.क्र.2021/कोविड/ 493 दिनांक : 22/11/2021

प्रति,

कुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद.

विषय : कोविड-19 प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत.

संदर्भ :
1. साथरोग अधिनियम 1897 खंड 2, 3 व 4.
2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005.
3. या कार्यालयाचे आदेश दिनांक 5/10/2021.
4. शासन आदेश क्र.कोरोना/प्र.क्र.421/आरोग्य-5/दिनांक 6/10/2021.
5. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक कोरोना-2021/प्र.क्र.366/आ-5/ दिनांक 26/10/2021.
6. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे दूरचित्रवाणी परिषदेद्वारे बैठकीत आदेश दिनांक 31/10/2021.
7. या कार्यालयाचे आदेश जा.क्र.2021/जिआव्य/जि.नि.कक्ष/कावि-470, दिनांक 31/10/2021.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील संदर्भीय आदेश दि. 26 ऑक्टोंबर, 2021 व या कार्यालयाचे उपरोक्त नमूद आदेश दि. 31/10/2021 अन्वये ब्रेक दि चेन अंतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकीय/निमशासकीय व खाजगी, औद्योगिक आस्थापनांमध्ये मास्कचा वापर करणे व कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण तातडीने पूर्ण करण्याबाबत निर्देश लागू करण्यात आलेले आहेत.

तसेच मा मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. 02 नोव्हेंबर, 2021 रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्स मध्ये शासकीय अधिकारी/कर्मचारी, खाजगी आस्थापनेतील कर्मचारी, व्यावसायिक, फेरीवाले, रिक्षा/ टॅक्सी चालक व इतर कामगार / कर्मचारी यांचे तात्काळ लसीकरण पूर्ण करुन घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

मा. पंतप्रधान महोदयांनी दि. 03/11/2021 च्या VC मध्ये औरंगाबाद मधील लसीकरण राज्य तसेच राष्ट्रीय साध्यापेक्षा कमी असल्याने चिंता व्यक्त करुन, प्रभावी उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने तरी आपल्या अधिनस्त विद्यापीठांतर्गत सर्व विभाग प्रमुख शैक्षणिक शाखा, सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना कोविड-19 प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन्ही मात्रा (Dose) घेणे बंधनकारक असल्याने, कमीत

Scanned with CamScanner

कमी एक मात्रा (Dose) घेतली असल्याबाबतचे प्रमाणपत्र सर्व कर्मचारी, कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेतल्यानंतरच, माहे नोव्हेंबर-2021 (Paid in माहे डिसेंबर-2021) या महिन्याचे वेतन देयक अदा करण्यात यावे. ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी कोविड-19 प्रतिबंधात्मक लसीकरणाची एकही मात्रा घेतलेली नाही, अशा अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन अदा करण्यात येऊ नये, तसेच अधिकारी/कर्मचारी यांचे सर्व प्रकारचे वैयक्तिक मागण्या बाबतचे देयके पारीत करण्यात येऊ नये. खाजगी व्यक्ती बाबतच्या इतर वैयक्तिक देयाकासही उपरोक्त नमूद बाब अनिवार्य राहील. याबाबत आपले अधिनस्त सर्व अधिकारी यांना सक्त निर्देश देण्यात यावे.

वरील प्रमाणे सूचना देण्यात यत असून लसीकरण वृध्दींगत करण्यामध्ये आपला स्वयंस्फूर्त पुढाकार अपेक्षित असल्याने सदर बाब निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

(सुनील चव्हाण भाप्रसे) 22/11/2021
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
औरंगाबाद

प्रत :-

जिल्हा माहिती अधिकारी, औरंगाबाद यांना यांना माहितीस्तव सादर

Scanned with CamScanner